दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
● वर्ष १६ वे ● अंक १८३ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● मंगळवार दि.२८ सप्टेंबर २०२१ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासाला चालना देवू या : ना.आदिती तटकरे

दै.रायगड नगरी । अलिबाग

सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजना सन २०२१-२२ करिता रु. २७५.०० कोटी इतका निधी अर्थसंकल्पित करण्यात आला असून त्यापैकी रु. ८९.९० कोटी निधी प्राप्त झाला आहे. वित्त विभागाच्या शासन निर्णयानुसार एकूण तरतूदीपैकी ३० टक्के निधी कोविड- १९ वरील प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यासाठी राखीव ठेवण्याबाबत सूचना प्राप्त झाल्या आहेत. प्राप्त निधीपैकी रु. २७.९२ कोटीच्या कामांना मंजूरी देण्यात आली असून रु. १८.१९ कोटी इतका निधी वितरीत करण्यात आला आहे. विकास आराखड्याचे नियोजन करताना जिल्ह्यात राबवावयाच्या विकासकामांसाठी राज्य व केंद्राकडून मिळणाऱ्या निधीला अधिकाधिक प्राधान्य दिले जाईल, जिल्हा वार्षिक नियोजनच्या निधीतून सर्वांनी मिळून जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासाला चालना देवू या, असे प्रतिपादन राज्याच्या उद्योग, खनिकर्म, पर्यटन, फलोत्पादन, क्रीडा व युवक कल्याण, राजशिष्टाचार, विधी व न्याय, माहिती व जनसंपर्क राज्यमंत्री तथा पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांनी उपस्थित सदस्यांना दिली.

येथील जिल्हा नियोजन समितीची बैठक आज जिल्हा नियोजन सभागृहात पार पडली. या बैठकीस पालकमंत्री कु.आदिती तटकरे अध्यक्षस्थानी होत्या. यावेळी जिल्हा परिषद अध्यक्ष श्रीमती योगिता पारधी, खासदार सुनिल तटकरे, खासदार श्रीरंग बारणे, सर्वश्री आमदार बाळाराम पाटील, अनिकेत तटकरे, भरतशेठ गोगावले, प्रशांत ठाकूर, महेंद्र दळवी, महेंद्र थोरवे, महेश बालदी, माजी आमदार सुरेश लाड, मनोहर भोईर, जिल्हा नियोजन समितीचे सदस्य रविंद्र पाटील, ज्ञानेश्वर पाटील, वृषाली वाघमारे, विकास घरत, दर्शना भोईर, अमृता हरवंडकर, पद्मा पाटील, मोतीराम ठोंबरे, रीना घरत, सायली तोंडलेकर, आरती मोरे, आनंद यादव, अनूसया पादीर, सुधाकर घारे, रेखा दिसले, नम्रता कासार, राजश्री मिसाळ, मंगेश दांडेकर, बबन मनवे, किशोर जैन, चंद्रकांत कळंबे, ड.आस्वाद पाटील, प्रियदर्शनी पाटील, बबन चाचले, गीता जाधव, जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.किरण पाटील, पोलीस अधीक्षक अशोक दुधे, अपर जिल्हाधिकारी अमोल यादव, जिल्हा नियोजन अधिकारी जयसिंग मेहत्रे, निवासी उपजिल्हाधिकारी डॉ.पद्मश्री बैनाडे, विविध शासकीय यंत्रणांचे कार्यालयप्रमुख उपस्थित होते.

पालकमंत्री कु.आदिती तटकरे पुढे म्हणाल्या की, जिल्ह्यातील समस्यांचे निराकरण व विकास कामांचा हेतू डोळ्यासमोर ठेवून जिल्हा आराखड्याचे नियोजन करण्यात आले आहे. गेले दोन वर्ष आपण सर्वजणच कोरोना विरुद्धच्या लढ्यात व्यस्त होतो. मात्र आता कोरोना लसीकरण सुरु झाले आहे. जिल्ह्यातील संसर्गही कमी होत आहे. यासाठी सर्व पदाधिकारी आणि अधिकारी यांनी दिलेले योगदान निश्चितच महत्वाचे आहे. याबद्दल कोरोनाविरुद्धच्या लढ्यासाठी जिल्हा नियोजन समितीतून सन २०२१-२२ मध्ये आतापर्यंत रु.२६.९२ कोटी च्या प्रशासकीय मान्यता देऊन रू.१८.१९ कोटी वितरीत करण्यात आले असून ऑगस्ट अखेर रू.८.०४ कोटी खर्च करण्यात आला आहे. कोरोना परिस्थितीमुळे राज्य शासनासमोर आर्थिक संकट आहे. त्यामुळे अद्याप पर्यंत जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) योजनांचा फक्त १० टक्केच निधी प्राप्त झाला असून आतापर्यंत एकूण रू. ८९.९० कोटी निधी प्राप्त झाला आहे.

उपस्थित सर्व खासदार, आमदार, नियोजन समिती सदस्य व सर्व अधिकारी यांना हा निधी जिल्ह्यातील विकास कामांवर खर्च व्हावा, अशा प्रकारे नियोजन करा, असे आवाहन करुन या कामातून जिल्ह्यातील सर्वसामान्य नागरिक यांचे जीवनमान उंचावेल, अशी कामे व्हावीत अशी अपेक्षा पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांनी यावेळी व्यक्त केली. रायगड जिल्ह्याच्या विकासासाठी आपण सर्व एकत्र येऊन काम करुया, जिल्ह्याला विकासाच्या मार्गावर नेऊया, यासाठी आपल्या सर्वांचे सहकार्य मला मिळावे, असेही आवाहन त्यांनी उपस्थित सर्व सदस्यांना केले.

सहकारी संस्था जिल्हा उपनिबंधकासह मुख्य लिपीक अँटी करप्शनच्या जाळ्यात

रायगड लाचलुचपत प्रतिबंधक विभागाची कारवाई

दै.रायगड नगरी । अलिबाग

गृहनिर्माण संस्था स्थापनेच्या प्रलंबित प्रकरणाचा निकाल देण्यासाठी ४० हजारांची लाच स्वीकारल्याप्रकरणी सहकारी संस्था जिल्हा उपनिबंधक गोपाळ मावळे व कार्यालयातील मुख्य लिपीक सुहास दवटे यांना रंगेहाथ पकडण्यात आले आहे. रायगड लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने सापळा रचून ही कारवाई केली.

आज (२७ सप्टेंबर) दुपारी पावणेदोन वाजण्याच्या सुमारास ही यशस्वी कारवाई करण्यात आली. तक्रारदार यांच्या अष्टमी ता. रोहा येथील माऊली इनक्लेव्ह गृहनिर्माण संस्था स्थापनेचे काम जिल्हा उपनिबंधक-सहकारी संस्था कार्यालयात प्रलंबित होते.

या प्रलंबित प्रकरणाचा निकाल देण्यासाठी सहकारी संस्था जिल्हा उपनिबंधक गोपाळ गेणू मावळे (वय ५२) यांनी ४० हजारांच्या लाचेची मागणी केली होती. याप्रकरणी तक्रारदाराने रायगड लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार केली होती. या तक्रारीची २३ सप्टेंबर रोजी पडताळणी केली असता, मावळे यांनी लाचेची रक्कम २७ सप्टेंबर रोजी घेऊन येण्यास सांगितले होते.

त्याप्रमाणे आज दुपारी जिल्हा उपनिबंधक-सहकारी संस्था कार्यालयात सापळा रचण्यात आला होता. दुपारी पावणेदोन वाजण्याच्या सुमारास जिल्हा उपनिबंधक मावळे यांनी सांगितलेली ४० हजारांची लाच स्वीकारताना कार्यालयातील मुख्य लिपीक सुहास दत्तात्रेय दवटे (वय ५४) यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने रंगेहाथ पकडले. याप्रकरणी जिल्हा उपनिबंधक मावळे व मुख्य लिपीक दवटे ताब्यात घेण्यात आले असून, उद्या (२८ सप्टेंबर) न्यायालयात हजर केले जाणार आहे. दरम्यान, पोलीस उपअधीक्षक सुषमा सोनावणे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक रंजित गलांडे, पोलीस हवालदार दिपक मोरे, महेश पाटील, सूरज पाटील, कौस्तुभ मगर, विवेक खंडागळे यांनी ही यशस्वी कारवाई केली.

उरणमध्ये भारत बंदच्या पाठींब्यासाठी मिरवणूक

दै.रायगड नगरी । उरण

मोदी सरकारच्या कृषी विषयक तीन कायद्यांविरोधात मागील दहा महिन्यापासून दिल्लीच्या सीमेवर लढत असून त्यांना पाठिंबा देण्यासाठी सोमवारी भारत बंदची हाक दिली होती. या बंदला पाठिंबा देण्यासाठी उरण मध्ये मिरवणूक काढण्यात आली होती. मिरवणुकीत मार्क्सवादी कम्युनिष्ट पक्ष, काँग्रेस व शेतकरी कामगार पक्ष यांच्या पक्षाने यामध्ये सहभाग घेतला होता.

यावेळी महागाई, बेरोजगारी वाढविणारे मोदी सरकार चले जावं,शेतकरी विरोधी कायदे रद्द करा, कामगारांना देशोधडीला लावणाऱ्या नवीन कामगार सहिता मागे घ्या. महागाई कमी करा, आदी जोरदार घोषणा देण्यात आल्या. यावेळी काँग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत यांनी मोदी सरकारवर जोरदार टीका केली. हे सरकार जातीवादी व भांडवलदार धार्जिणे असल्याचीही टीका त्यांनी यावेळी केली.

जेएनपीटीचे कामगार विश्वस्त कॉम्रेड भूषण पाटील यांनीही कामगारांना व शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी कामगार शक्ती मजबूत करण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले. मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे जिल्हा सचिव कॉम्रेड संजय ठाकूर, उमेश भोईर माजी नगरसेविका आफशा मुखरी, संध्या ठाकूर, प्रमाणे शेकापच्या सीमा घरत, जनवादी महिला संघटनेच्या सचिव अमिता ठाकूर, सीआयटीयुचे रायगड जिल्हा अध्यक्ष मधुसूदन म्हात्रे यांनी यावेळी मार्गदर्शन केले.

संक्षिप्त...

भाजपच्या संजय उपाध्याय यांची माघार ; रजनी पाटील राज्यसभेवर जाणार

नवीदिल्ली : वृत्तसंस्था

राजीव सातव यांच्या निधनामुळं रिक्त झालेल्या महाराष्ट्रात राज्यसभेच्या एका जागेसाठी निवडणूक होण्याचं टळलं आहे. कारण भाजपचे उमेदवार संजय उपाध्याय यांनी या निवडणुकीतून माघार घेतली आहे.

त्यामुळं राज्यसभा निवडणूक बिनविरोध होणार असल्याचं स्पष्ट झालं आहे.

उपाध्याय यांनी माघार घेतल्यानं काँग्रेसच्या रजनी पाटील यांची राज्यसभेवर जाण्याची वाट मोकळी झाली आहे. त्यांच्या विजयाची आता केवळ औपचारिकता बाकी आहे.

आज अर्ज माघारी घेण्याचा अंतिम दिवस होता. जर भाजपने अर्ज माघारी घेतला नसता तर या एका जागेसाठी ४ ऑक्टोबरला मतदान होणार होतं.

एकाच जागेसाठी निवडणूक असल्याने आणि महाविकास आघाडीकडे तूर्तास बहुमत असल्याने निवडणूक फारशी अवघड नव्हती मात्र तरी यासाठी रिस्क न घेता काँग्रेस नेत्यांनी भाजप नेत्यांसोबत बिनविरोध निवडणुकीबाबत चर्चा केली होती.

मुंबई-पुणे एक्सप्रेवर अपघात ; नवीमुंबईमधील डॉक्टरचा मृत्यू

दै.रायगड नगरी । खोपोली

मुंबई-पुणे एक्स्प्रेस हायवेवर झालेल्या भीषण अपघातात नवी मुंबईतील डॉक्टरचा मृत्यू झाला.

नवी मुंबई येथील डॉ.आदित्य तंखीवले हे हुंडाई आयटेन या त्यांच्या कारने पुण्याहून मुंबईकडे येत होते. एक्स्प्रेस हायवेवर किलोमीटर ४० या अंतरावर ते आले असता एका वळणावर समोरील ट्रेलर पलटी झाला. त्या ट्रेलरमध्ये कागदाचे भले मोठे रिम होते. ते रिम ट्रेलरमधून सटकले. त्यातील काही रिम मागून जात असलेल्या आदित्य तंखीवले यांच्या कारवर कोसळले. रिमचे वजन खूप असल्याने काही कळायच्या आतच आदित्य यांची कार त्या रिमखाली दबली गेली व अक्षरशः चपटी झाली. त्यात आदित्यही दबले

गेले. अपघाताची माहिती मिळताच बोरघाट पोलीस, देवदूत यंत्रणा, अपघातग्रस्तांच्या मदतीला या संस्थेचे सदस्य घटनास्थळी पोहचले; पण खूप वेळ गेला होता. कारमध्ये आदित्य अडकून पडले होते. सर्व बचाव यंत्रणेने कारच्या काचा फोडून आदित्य यांना बाहेर काढले; पण त्यांचा जागीच मृत्यू झाला होता.

अजित पवारांवर मोदी सरकारनं सोपवली खास कामगिरी

दै.रायगड नगरी । मुंबई

वस्तू व सेवा करप्रणालीतील (जीएसटी) त्रूटी दूर करुन ती सहज, सोपी करण्यासंदर्भात सुधारणा सूचविण्यासाठी महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली विविध राज्यांच्या उपमुख्यमंत्री व अर्थमंत्र्यांचा मंत्रीगट स्थापन करण्यात आला आहे. मंत्रीगटाने शिफारस केलेल्या आणि जीएसटी परीषदेने मंजूर केलेल्या सुधारणांच्या अंमलबजावणीवर देखील हाच मंत्रीगट देखरेख ठेवणार आहे. केंद्रीय अर्थमंत्रालयाने त्यासंदर्भातील आदेश नुकतेच जारी केले. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेल्या मंत्रीगटात दिल्लीचे उपमुख्यमंत्री मनिष सिसोदीया, हरयाणाचे उपमुख्यमंत्री दुष्यंत चौताला, आंध्रप्रदेशचे अर्थमंत्री बुगना राजेंद्रनाथ, आसामचे अर्थमंत्री अजंटा निओग, छत्तीसगडचे व्यापार करमंत्री टी. एस. सिंगदेव, ओडीसाचे अर्थमंत्री निरंजन पुजारी, तामिळनाडूचे अर्थमंत्री डॉ. पलानीवेल थैगाराजन यांचा समावेश आहे.

टपाल नाका ते उरण नाका एकदिशा मार्गाची काटेकोर अंमलबजावणी

पनवेल वाहतूक विभागाने केले वाहतुकीचे नियोजन

दै.रायगड नगरी । पनवेल

गेल्या अनेक दिवसांपासून पनवेल शहराला वाहतुक कोंडीची प्रचंड समस्या भेडसावत आहे. बेकायदा पार्किंग, नो एन्ट्रीचे उल्लंघन, सम विषम पार्किंगचे उल्लंघन यासारख्या विविध वाहतूक नियमांचे उल्लंघन केले जात असल्याने नागरिकांसह वाहतूक विभागाला देखील डोकेदुखी ठरत होती. शहरात प्रामुख्याने उरण नाका, टपाल नाका, मोमीन पाडा याठिकाणी मोठ्या प्रमाणात वाहतुकीला अडथळा निर्माण होत असल्याने याबाबत उपाययोजना करण्यासाठी पनवेल शहर वाहतूक विभागासह स्थानिक नगरसेवकांनी पुढाकार घेऊन शहराच्या वाहतूक कोंडीचा सर्व्हे करण्यात आला. त्या अनुषंगाने टपाल नाका ते उरण नाका हा मार्ग एकदिशा मार्ग ठरवण्यात आला आहे. तर उरणनाक्यापासून टपालनाक्याकडे येणाऱ्या सर्व वाहनांना (दुचाकी वगळून) प्रवेश बंद करण्यात आला आहे.

पंचरत्न सर्कल ते मोमीनपाडा मशीद मार्गे टपाल नाका या मार्गावर सम विषम पार्किंगची अंमलबजावणी करण्यात आली आहे. यासाठी वाहतूक विभागाच्या टोईंग व्हॅन विभागालाही कारवाई करण्याबाबत आदेशित करण्यात आले आहे. या मार्गावरील दुकानदारांनाही सम विषय वाहने पार्किंग बाबत सूचना देण्यात आल्या आहेत. अन्यथा उल्लंघन केल्यास कारवाईला सामोरे जावे लागेल असे आवाहन पनवेल शहर वाहतूक विभागाचे पोलीस निरीक्षक संजय नाळे यांनी केले आहे.

उरण नाका ते टपाल नाका या मार्गावर दुचाकी वाहनांना सूट देण्यात आली आहे. तर तीन चाकी, चार चाकी व मालवाहू वाहनांना बंदी घालण्यात आली आहे. याठिकाणच्या वापाऱ्यांच्या प्रतिनिधींसोबत बैठक घेण्यात आली आहे. व्यापाऱ्यांनी देखील याबाबत काळजी घेतली जाईल असे आश्वासन दिले आहे. याबाबत व्यापाऱ्यांना वाहतूक विभागामार्फत नोटीस देखील दिल्या जाणार आहेत. व्यापाऱ्यांनी सहकार्य करणे अपेक्षित आहे, मात्र त्यादृष्टीने अंमलबजावणी न झाल्यास कारवाईच्या अनुषंगाने पावले उचलली जातील.

- संजय नाळे (पोलीस निरीक्षक, पनवेल शहर वाहतूक विभाग)

...//२

राज्यस्तरीय स्पर्धेत कोमल वंजारे तर रायगड जिल्हास्तरीय स्पर्धेत मुग्धा दातार यांनी मारली बाजी

दै.रायगड नगरी । पनवेल

अखिल भारतीय नाट्य परिषद पनवेल शाखा आणि श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या मायबोली एकपात्री अभिनय राज्यस्तरीय स्पर्धेत कांदिवलीच्या कोमल वंजारे तर रायगड जिल्हास्तरीय स्पर्धेत पनवेलच्या मुग्धा दातार यांनी बाजी मारली.

अखिल भारतीय नाट्य परिषद पनवेल शाखेचे अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, उपाध्यक्ष तथा पनवेल महापालिकेचे सभागृहनेते परेश ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. मराठी भाषेत आयोजित करण्यात आलेली हि स्पर्धा दोन फेऱ्यांमध्ये पार पडली होती. अंतिम फेरी पनवेलमधील श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या सभागृहात संपन्न झाली. अंतिम फेरीचे उद्घाटन महापौर डॉ. कविता चौतमोल यांच्या हस्ते झाले. तर पारितोषिक वितरण माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून सुप्रसिद्ध सिनेनाट्य निर्मात्या कल्पना कोठारी, अभिनेते प्रभाकर मोरे, भरत साळवे, तसेच नाट्य परिषद पनवेल शाखा उपाध्यक्ष

...//२

भारत बंदला शेतकऱ्यांचा पाठींबा: गडब येथे शेतकऱ्यांची निदर्शने

दै.रायगड गरी । पेण

केंद्र सरकारने नुकताच पारित केलेल्या तीन कृषी कायद्याविरोधात देशातील विविध शेतकरी संघटनांनी भारत बंदची हाक दिली होती. तसेच पेट्रोल, डिझेलची दरवाढ, कामगार विरोधी कायद्याला विरोध करण्यासाठी देशा-तील अनेक शेतकरी संघटना संघटनांनी भारत बंद पुकारला होता या भारत बंदला प्रस्तावित डोलवी औद्योगिक शेतकरी संघर्ष समितीने पाठिंबा देऊन पेण तालुक्यातील गडब येथे कृषी कायद्या विरोधात निदर्शने केली.

यावेळी रायगड जिल्हा काँग्रेसचे चिटणीस परशुराम म्हात्रे गडब- काराव ग्रामपंचायतीचे उपसरपंच लक्ष्मण कोठेकर, के जी म्हात्रे, सुशील कोठेकर सिताराम चवरकर, नित्यानंद पाटील, महेश पाटील, प्रभाकर म्हात्रे,चंद्रकात पाटील, तुकाराम पाटील किसन पाटील, कमलाकर पाटील, आदिसह गडब, डोलवी, वडखळ परिसरातील शेतकरी उपस्थित होते यावेळी शेतकरी विरोधी कृषी कायद्याचा निषेध केला तर या परिसरातील शेतजमिनी औद्योगिक विकास महामंडळा मार्फत संपादित करण्या संदर्भात शेतक-यांना नोटीशी बजावण्यात आल्यात या भुसंपादनाला येथील शेतक-यांनी विरोध दर्शविला असुन कोणत्याही परिस्थितीत औद्योगिक विकास महामंडळाला आमच्या जमिनी देणार नाही असा निर्धार या वेळी शेतकऱ्यांनी व्यक्त केला.

सोनसाखळी चोरी रोखण्यासाठी बीट मार्शल तैनात करा ; खारघर भाजपची मागणी

दै.रायगड नगरी । पनवेल

खारघर विभागात सोनसाखळी चोरी, मोबाईल चोरी भर दिवसा असे अनुचित प्रकार घडत आहेत. नागरिकांच्या सुरक्षेसाठी त्यावर तातडीने उपाययोजना म्हणून बीट मार्शल तैनात करण्यात यावे अशी विनंती खारघर भाजपाच्यावतीने खारघर, नवी मुंबई पोलिसांना करण्यात आली आणि त्यांनी सदर मागणी त्वरित मान्य केली. यावेळी खारघर शहर अध्यक्ष ब्रिजेश पटेल, नगरसेवक प्रवीण पाटील, रामजी बेरा, नगरसेविका हर्षदा उपाध्याय, सरचिटणीस दिपक शिंदे, उपाध्यक्ष दिलीप जाधव, उपाध्यक्ष संजय घरत, सरचिटणीस युवा मोर्चा अमर उपाध्याय, सुमीत सहाय आणि इतर पदाधिकारी उपस्थित होते.

Shri.Mujavar Saheb
Adv. Anil R Nagdeve

PUBLIC NOTICE
IN THE COURT OF HON'BLE CIVIL JUDGE SENIOR DIVISON PANVEL, AT PANVEL
CIVIL MISC. APPL.1037/2021
Exh : 8/D
Next Date : 11/10/21

Late Mrs.Vijaya Namdeo Waghmare (Deceased)
1) MR.PRADNYAVANT NAMDEO WAGHMARE
Age 35 yrs, Occupation : Business
2) MR.SUBODHKUMAR NAMDEO WAGHMARE
Age : 33 yrs, Occupation : Service
Residing at C-5/3/2, CIDCO Coloy,
Sector No.18, New Panvel (E),
Tal-Panvel, Dist-Raigad Applicants

Let it be known to all concerned that deceased **Mrs.Vijaya Namdeo Waghmare** died on 21/10/2016 therefore the aaplicant has filed the Misc.Application No.1037 for getting Heirship Cerfiticate Under the Provisions of Bombay Regulation VIII of 1827.

THE SCHEDULE OF THE IMMOVABLE PROPERTY

Flat No.402, Fourth Floor, B Wing, area 496 sq. ft. Built-up Equivalent 46.10 sq.Mtr.Built-up Trimurty Aangan, Plot No.50, Sector-20, Kamothe, Tal-Panvel, Dist-Raigad

If any Person/s have any objection title, claim share, or any kind of interest in the said share property, which is more particularly described in the schedule hereinabove, is hereby invited, then they may appear in person or through their Advocate, objecting this application in the Court of Civil Judge Sr. Division at Panvel, Dist.Raigad, Maharashtra. If no one appears and objects for the same within 30 days from the date of publication of this notice then this Hon'ble Court will proceed to pass the necessary order thereon which please note.

Place : Panvel
Date : 27/09/2021

Sd/-
Jr.Clerk
Civil Court, Panvel

Court Seal

Sd/-
Asstt.Superintent.
Civil Court, Panvel

अर्जदारतर्फे वकील
ॲड.निखील भोईर

जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांचे कोर्टात
क्रिमिनल एम.ए.नं.९०९/२०२१
नि.नं.७/ड
ने.ता.२८/१०/२०२१

श्री.ताई नंदकुमार कडू अर्जदार
विरुद्ध
ग्रामसेवक / ग्रामपंचायत गव्हाण सामनेवाला

ज्याअर्थी अर्जदार यांचा मुलगा कै.अमित नंदकुमार कडू हा दि.२८/०५/१९९८ रोजी मौजे : बेलपाडा, तालुका : पनवेल, जि.रायगड येथे राहत्या घरी निधन झाले असल्याने अर्जदार हिने या न्यायालयात कै.अमित नंदकुमार कडू यांच्या मृत्यूच्या तारखेची नोंद ग्रामपंचायत गव्हाण यांचे कार्यालयात होण्याकरिता पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांचे कोर्टात अर्ज दाखल केलेला आहे.

सदरहून कै.अमित नंदकुमार कडू हे व नमूद ठिकाणी मयत झाले आहेत किंवा कसे हे कोणास समजविण्याचे असेल तर या जाहीर नोटीसीच्या तारखेपासून एक महिन्याच्या आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू न्यायालय अर्जदार यांच्याकडे लागलीच पुरावा घेवून त्यास सदर व्यक्तीचे मृत्यूची नोंद करण्याचे आदेश संबंधितांना देईल.

येणेप्रमाणे ही जाहीर नोटीस आमच्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी आज दि.२७/०९/२०२१ रोजी दिली.

सही/-
क.लिपीक
फौ.न्या.क.स्तर, पनवेल

कोर्टाचा शिक्का

सही/-
सहा.अधिक्षक
फौ.न्या.क.स्तर, पनवेल

तातडीने पुनर्वसन कार्याला प्राधान्य : प्रांताधिकारी

दै.रायगड नगरी । पोलादपूर

तालुक्यातील देवळे ग्रुपग्रामपंचायत हद्दीतील दरडग्रस्त केवनाळे गावाच्या पुनर्वसनाचे कार्य तातडीने करण्याची गरज असून जिऑलॉजिक सर्व्हेनुसार वर्ग १मध्ये आल्याने पुनर्वसन कार्याला प्राधान्य देण्यात येणार असल्याचे म हाड उपविभागीय अधिकारी तथा प्रांताधिकारी प्रतिमा पुदलवाड यांनी सांगितले.

केवनाळे येथील श्रीविठ्ठलरखुमाई मंदिराम ध्ये केवनाळे येथील बाधित घरांतील तसेच दरडप्रवण क्षेत्रातील अन्य घरांमधील स्थानिक तसेच मुंबईस्थित मंडळींसोबत चर्चेदरम्यान प्रांताधिकारी प्रतिमा पुदलवाड यांनी ही माहिती दिली. यावेळी महाड विधानसभा मतदार संघाचे आमदार भरत गोगावले यांनी शासनाने सर्वतोपरी सहकार्याची भूमिका ठेवल्याने आता ग्रामस्थांनीही त्वरीत प्रशासनाला सहकार्य करा, असे आवाहन केले.

याप्रसंगी पोलादपूर तहसिलदार दिप्ती देसाई, राजिप सदस्य चंद्रकांत कळंबे, अनिल दळवी, तलाठी बनसोडे, तालुकाप्रमुख निलेश अहिरे तसेच अन्य स्थानिक मान्यवर उपस्थित होते. यावेळी प्रांताधिकारी प्रतिमा पुदलवाड यांनी, आंबेमाची येथील ग्रामस्थ पुनर्वसनासाठी तयार नसल्याची माहिती देत आंबेमाची गा–वाचा जिऑलॉजिक सर्व्हे अद्याप प्राप्त झाला नसल्याची माहिती दिली. आ.गोगावले यांनी पुनर्वसन मंत्री ना. एकनाथ शिंदे यांच्यासमक्ष दरडग्रस्तांना नवीन घरे देऊन पुनर्वसन करताना पुढील ओटी, माजघर, दोन बेडरूम, किचन आणि परसावन अशा स्वरूपाचे सुमारे आठशे ते हजार स्क्वेअरफूट आकाराचे द्यावे तसेच मंदिर, शाळा व अन्य सुविधादेखील देण्यात याव्या, अशी मागणी केल्याचे सांगितले.

यावेळी वाकण सजेचे केवनाळे गाव समाविष्ट असलेल्या कार्यक्षेत्राचे तलाठी बनसोडे यांनी नवीन घरे देताना सध्याची घरेदेखील वापरता येतील, अशी माहिती दिल्यामुळे ग्रामस्थांना प्रशासनाची नवीन भूमिका अन्यायकारक वाटत असल्याचे यावेळी ग्रामस्थांनी स्पष्ट केले.

यावेळी दरडग्रस्त ग्रामस्थांनी प्रांताधिकारी प्रतिमा पुदलवाड आणि आ.भरत गोगावले यांना एक निवेदन दिले. यामध्ये पुनर्वसनासाठी नवीन घरे देताना सध्याची घरे वापरण्यास दिली तर संपूर्ण गांव पुनर्वसनास तयार होईल, जर सध्याची घरे वापरायला दिली नाही तर पुनर्वसन आराखडा दाखवावा त्यानुसार जे ग्रामस्थ पुनर्वसनास तयार होतील त्यांचे पुनर्वसन करावे आणि जे तयार होणार ना–हीत त्यांच्यासाठी कॉमन हॉल तयार करून वापरण्यासाठी द्यावा, आपदकाळात ग्रामस्थ हा कॉमन हॉल वापरतील, अशी भूमिका मुंबई येथील केवनाळे ग्रामस्थ मंडळाच्या पदाधिकारी सदस्यांनी घेतली. यामध्ये ज्ञानेश्वर दाभेकर, रामजी दाभेकर, दत्ताराम पवार, गणपत दाभेकर, सीताराम पोकळे, बानोबा आगोंडे, आनंदा दाभेकर, मनोहर उफाळे, भाऊ दाभेकर, शांताराम दाभेकर, शंकर पोकळे, हरी दाभेकर, चंदर सोनावणे, आनंद सोनावणे, विठोबा दाभेकर आदींनी चर्चेमध्ये सहभाग घेतला.

आफ्रिकेतून रायगड जिल्ह्यात माणगांव येथे आला दुर्मिळ कोकीळ पक्षी

दै.रायगड नगरी । उतेखोल/माणगाव

रायगड जिल्ह्यात माणगांव येथे वन्यजीव अभ्यासक व छायाचित्रकार शंतनु कुवेसकर यांनी अतिशय दुर्मिळ छोट्या कोकीळ पक्ष्याची शनिवार दिनांक २५ सप्टेंबर रोजी नोंद केली आहे. लेसर कुकू म्हणजेच मराठीत छोटा कोकीळ हा पक्षी युरेशिअन कुकू म्हणजेच सामान्य कोकीळ सारखाच असून त्याची ओळख करणे कठीण असते, पूर्ण वाढ झालेला पक्षी निळसर राखाडी रंगाचा असून छातीवर काळे पट्टे असतात व आकाराने थोडा छोटा असून त्याचे डोळे गडद तपकिरी रंगाचे असतात. छोटे कोकीळ हे मुख्यतः त्यांच्या मधुर गाणे गाण्यासाठी ओळखले जातात.

पावसाळा संपताच काही कोकीळ प्रजाती भारतभर स्थलांतर करतात. त्यातील पॅसेज मायग्रंट म्हणजेच अल्प कालावधीसाठी स्थलांतर करणारा हा छोटा कोकीळ पक्षी असून आफ्रिकेतून स्थलांतर करून दक्षिण भारतात सप्टेंबर ते डिसेंबर दरम्यान हे पक्षी दिसून येत असल्याच्या काही मोजक्याच नोंदी आहेत व कोंकणात सध्याच्या मोसमात अनेक पक्ष्यांसाठी अनुकूल वातावरण असते व त्यांना

येथे मुबलक खाद्य मिळते असे शंतनु कुवेसकर यांनी सांगितले.

गेल्या २० वर्षांमध्ये कोंकण तसेच सोबत मुंबई परिसरातून छोटा कोकीळ या पक्षाच्या ६ ते ७ अधिकृत नोंदी असल्याचे मुंबई येथील पक्षीनिरीक्षक व निसर्गवादी लेखक संजय मोंगा यांनी सांगितले. तसेच ह्या कोकीळ पक्ष्यांचे प्रजनन हिमालय व उत्तर–पूर्व भार–तात चांगल्या प्रमाणात होत असल्याचे ते म्हणाले.

वन्यजीव चित्रपट निर्माती व छायाचित्रकार ऐश्वर्या श्रीधर हिने सांगितल्याप्रमाणे हा दुर्मिळ कोकीळ पक्षी वसंत ऋतू चे आगमन दर्शवत असून त्याचा स्थलांतराचा मार्ग शक्यतो दक्षिणेकडील भारत असून महाराष्ट्रात त्याला पाहणे निश्चितच रोमांचक आहे. अशा पक्ष्यांचे आपल्या परिसरातील वास्तव्य आपली वनसंपदा संपन्न असल्याचे दर्शवत असून सदरचे प्रदेश संरक्षित राहायला हवेत.

अर्जदारतर्फे वकील
ॲड.एच.ए.भगत

जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांचे कोर्टात
फौ.अर्ज नं.९०६/२०२१
नि.नं.७/ड
ने.ता.२८/१०/२०२१

श्रीमती.हिराबाई अनंत पाटील अर्जदार
विरुद्ध
मा.आयुक्त, महानगरपालिका पनवेल सामनेवाले

ज्याअर्थी अर्जदार यांचे पती श्री.अनंता जोमा पाटील यांचा मृत्यू दि.२५/०३/१९८८ रोजी मौजे : सिद्धी करवले, ता.पनवेल, जि.रायगड येथे झालेला आहे. मृत्यूनंतर धार्मिक रितीरिवाजाप्रमाणे मौजे : सिद्धी करवले, ता.पनवेल, जि.रायगड येथील स्मशानभूमीत जाळीत करण्यात आलेले आहे. मात्र सदर अर्जदार यांचे नजरचुकीमुळे त्यांचे पतीची मृत्यूची नोंद ग्रामपंचायत कार्यालय सिद्धी करवले येथे करण्याची राहून गेली असल्याने अर्जदाराने या न्यायालयात श्री.अनंता जोमा पाटील यांच्या मृत्यूच्या तारखेची नोंद होण्याकरिता पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांचे कोर्टात अर्ज दाखल केलेला आहे.

सदरहू श्री.अनंता जोमा पाटील यांचा वर नमूद ठिकाणी दि.२५/०३/१९८८ रोजी मृत्यू झालेला आहे त्यास कोणाचीही हरकत असेल तर या जाहीर नोटीशीच्या तारखेपासून एक महिन्याच्या आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात. तसेच या लेखा–वरुन असे कळविण्यात येते की, जर सदर मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहून न्यायालय अर्जदार यांच्याकडे लागलीच पुरावा घेवून त्यास सदर व्यक्तीचे मृत्यूची नोंद करण्याचे आदेश संबंधितांना देईल.

येणेप्रमाणे ही जाहीर नोटीस आमच्या सहनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी आज दि.२७/०९/२०२१ रोजी दिली.

सही/-
क.लिपीक
फौ.न्या.क.स्तर, पनवेल

कोर्टाचा शिक्का

सही/-
सहा.अधिक्षक
फौ.न्या.क.स्तर, पनवेल

माथेरान बाबतीत जिल्हाधिकाऱ्यांचा सकारात्मक दृष्टीकोन

दै.रायगड नगरी । माथेरान

माथेरान हे असे एक रमणीय स्थळ आहे की ज्याच्या प्रेमात आपसूकच पडतात मग ते नवनवीन पर्यटक असोत अथवा वरिष्ठ अधिकारी वर्ग असो इथल्या समस्या अडचणी अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून दिल्यास त्यावर तोडगा काढण्यासाठी ते तत्परता दाखवतात. आज दि.२७ रोजी जिल्हाधिकारी महेंद्र कल्याणकर यांच्या दालनात माथेरानच्या नगराध्यक्षा प्रेरणा प्रसाद सावंत यांची नियोजित भेट असल्याने प्रेरणा सावंत यांनी अनेक विषय जिल्हाधिकारी यांच्या निदर्शनास आणून दिले. यामध्ये प्रामुख्याने इथे भेडसावत असणारी वाहतूक समस्या दूर करण्यासाठी आपल्या माध्यमातून प्रयत्न करावेत असे प्रारंभी सांगितले वाहतूकीची बाब ही खूपच खर्चिक असून यामुळेच स्थानिकांसह पर्यटकांचे अक्षरशः कंबरडे मोडते. जीवनावश्यक वस्तूंच्या किंमती तर गगनाला भिडल्या आहेत.यावर ठोस उपाययोजना करणे गरजेचे बनले आहे. त्याचप्रमाणे वनसंपदा दरवर्षी लोप पावत चालली आहे,इतर महत्वाच्या समस्या बाबतीत डीएफओ आणि अधीक्षक रायगड यांची संयुक्त बैठक ऑक्टोबर महिन्याच्या पहिल्या आठवड्यात आयोजित करण्यात येणार असून लवकरच मी स्वतः माथेरानला भेट देणार असल्याचे

जिल्हाधिकारी यांनी स्पष्ट केले.यावेळी नगरपरिषदेच्या विविध विषयांवर चर्चा करण्यात आली यामध्ये मुख्य उत्पन्नाचे स्रोत असलेल्या प्रवासी कराचा महत्वपूर्ण विषय सुध्दा घेण्यात आला.शैक्षणिक सुविधा आणि इथे पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी बोटानीकल गार्डनची निर्मिती झाल्यास पर्यटकांना याचा आनंद घेता येईल असेही नगराध्यक्षा प्रेरणा सावंत यांनी जिल्हाधिकारी यांच्या कडे स्पष्ट केले. यावेळी माथेरानच्या नवोदित मुख्याधिकारी सुरेखा भणगे(शिंदे) उपस्थित होत्या.

ग्रामपंचायत कोळखे

ता.पनवेल, जि.रायगड

जाहीर निविदा

दि. २७/०९/२०२१

प्रति,
अधिकृत / अनुभवी ठेकेदार,

यांस कळविण्यात येते की, ग्रामपंचायत कोळखे हद्दीतील ग्रामनिधी योजनेंतर्गत खालील विकासकामे करावयाची आहेत. त्याकरिता ग्रामंपचायत हद्दीतील अधिकृत/अनुभवी ठेकेदारांकडून सिलबंद निविदा मागविण्यात येत आहे. सदर कामांच्या कोऱ्या निविदा मिळण्याकरिता अर्जाची तारीख दि. २८/०९/२०२१ ते ०४/१०/२०२१ पर्यंत या दिवशी कार्यालयीन वेळेत ग्रामपंचायत कार्यालयात मिळतील.

सदर निविदा दि. ०५/१०/२०२१ रोजी दुपारी २ वाजेपर्यंत स्वीकारल्या जातील. सदर निविदा त्याच दिवशी कार्यालयीन वेळेत ३ वाजेपर्यंत उघडण्यात येतील. कामांकरिता लागणारी इसारा रक्कम ग्रामपंचायत कोळखे यांच्या नावाने डिमांड ड्राफ्टच्या द्वारे / रोखीने स्वीकारण्यात येतील. कोणतीही एक निविदा मंजूर करणे अगर नाकारण्याचा अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवला आहे. इसारा रक्कम अंतिम देयकातून कापून घेतली जाईल.

अ.क्र.	कामाचे नाव	अंदाजपत्रक रक्कम	इसारा रक्कम १%	कालावधी
१	कोळखे येथील चामुंडा ट्रेडर्स ते बसेरा बाग पर्यंत रस्ता दुरुसती करणे	२३१५४९/-	२३१५/-	३ महिने
२	पारपूंड येथील मुख्य रस्ता ते प्रदीप पाध्ये घरापर्यंत रस्ता दुरुस्ती करणे	१००००/-	१०००/-	३ महिने
३	पेठ येथील आकाश सुरते ते मुख्य गटर पर्यंत पाईप गटर टाकणे	९१९४४/-	९१९/-	३ महिने

अटी व शर्ती :-

१) सर्वांत कमी दराचे अथवा कोणतेही टेंडर मंजूर अगर नामंजूर करण्याचा अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवला आहे त्याची कारणे दिली जाणार नाहीत.

२) सदर काम पंचायत समितीकडील बांधकाम विभाग तांत्रिक अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली करणेचे आहे त्याचे मूल्यांकनाप्रमाणे बील अदा करण्यात येईल.

३) काम ज्यांच्या नावे मंजूर होईल त्यांनी नियमा प्रमाणे रूपये १०० स्टॅम्प पेपरवर बॉण्ड करून देणे.

४) कामाचे एस्टीमेंट ऑफिस वेळेत पहावयास मिळेल.

५) दिलेल्या मुदतीत काम पूर्ण न झाल्यास बिल अदा करणे अगर न करणे याचा अधिकार ग्रामपंचायतीस राहील.

सही/-
ग्रामसेवक
ग्रामपंचायत कोळखे

सही/-
सरपंच
ग्रामपंचायत कोळखे

पृष्ठ क्र.१ वरुन...

टपाल नाका ते उरण नाका एकदिशा मार्गाची काटेकोर अंमलबजावणी

होताना दिसून येत नव्हते. याबाबत पनवेल शहर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अजयकुमार लांडगे, वाहतूक विभागाचे पोलीस निरीक्षक संजय नाळे यांच्यासह स्थानिक नगरसेवक यांच्यात बैठक घेण्यात आली. यावेळी शहराचा सर्व्हे करण्यात आला असून, शहरातील वाहतूक कोंडीच्या अनुषंगाने उपाययोजना करण्याविषयी चर्चा करण्यात आली.

उरण नाका ते टपाल नाका हा शहरातील मोठ्या वर्दळीचा मार्ग असून दोन्ही दिशेने वाहने आल्यामुळे याठिकाणी मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी निर्माण होते. त्यामुळे नागरिकांची गैरसोय होत असल्याने तक्रारी देखील वाढल्या होत्या. या अनुषंगाने वाहतुकीचे नियमन व सुसूत्रता आणण्यासाठी आजपासून (सोमवार दि.२७ सप्टेंबर) अंमलबजावणी करण्यात आली. यावेळी पनवेल शहर वाहतूक विभागाचे पोलीस निरीक्षक संजय नाळे, पोलीस उपनिरीक्षक गणेश खांडेकर यांच्यासह वाहतूक विभागाचे कर्मचारी उपस्थित होते.

पनवेल शहरातील टपाल नाका, उरण नाका परिसरात व्यापाऱ्यांच्या दुकानासमोर वेळीअवेळी टेम्पो, ट्रक्स तसेच इतर अवजड वाहनांच्या बेकायदा पार्किंगमुळे मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडीची समस्या निर्माण होते. व्यापाऱ्यांच्या दुकानासमोर रस्त्याच्या मधोमध उभ्या असणाऱ्या मालाच्या गाड्यांच्या गर्दीतून वाट काढताना मोठी अडचण निर्माण होते. काही दिवसांपूर्वी नवी मुंबई वाहतूक विभागाचे पोलीस उपायुक्त पुरुषोत्तम कराड, सहाय्यक पोलीस आयुक्त भागवत सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली उरण नाका, टपाल नाका येथे निर्माण होणाऱ्या वाहतूक कोंडीच्या समस्येवर मार्ग काढण्यासाठी शहरातील व्यापाऱ्यांची बैठक बोलावण्यात आली होती. यावेळी वाहतूक कोंडी कमी करण्याच्या दृष्टिकोनातून विविध विषयांवर चर्चा करण्यात आली. तरीदेखील अद्यापही अनेक दुकानांसमोरील रस्त्यावर टेम्पो, ट्रक्स व ईतर अवजड वाहने उभी असल्याचे दिसून येते. तर काही ठिकाणी दुकानासमोर शिडी टाकून व्यापाऱ्यांकडून पार्किंग अडवण्यात येते. त्यामुळे अशांवर देखील कारवाई करण्याची मागणी नागरिकांमधून केली जात आहे.

राज्यस्तरीय स्पर्धेत कोमल वंजारे तर रायगड जिल्हास्तरीय स्पर्धेत मुग्धा दातार यांनी मारली बाजी

तथा महापालिका सभागृह नेते परेश ठाकूर, भाजपचे शहराध्यक्षा जयंत पगडे, नगरसेविका दर्शना भोईर, रुचिता लोंढे, नाट्य परिषद पनवेल शाखा सचिव श्यामनाथ पुंडे, सांस्कृतिक सेलचे जिल्हाध्यक्ष अभिषेक पटवर्धन, स्पर्धा प्रमुख गणेश जगताप, अमोल खेर, चिन्मय समेळ, संजय कुलकर्णी आदी उपस्थित होते.

राज्यस्तरीय मायबोली एकपात्री अभिनय स्पर्धेतील प्रथम क्रमांकास १० हजार रुपये, द्वितीय ०७ हजार, तृतीय क्रमांकास ०३ हजार रुपये, उतेजनार्थ पारितोषिके तर रायगड जिल्हास्तरीय अभिनय स्पर्धेतील प्रथम क्रमांकास ०५ हजार, द्वितीय ०३ हजार तर तृतीय क्रमांकास ०२ हजार रुपये, उतेजनार्थ पारितोषिके देऊन सन्मानित करण्यात आले. राज्यस्तरीय स्पर्धेत द्वितीय क्रमांक गायत्री नाईक (वसई), तृतीय क्रमांक निकिता झेपाळे(विलेपार्ले), उतेजनार्थ क्रमांक मानसी पवार (घाटकोपर), मृणालिनी वानखेडे (ऐरोली), महेंद्र गोंडाणे(भंडारा), प्रथमेश दिग्रजकर(नागपूर), सुमित सावंत (दिवा), युवराज ताम्हणकर(डोंबिवली), रायगड जिल्हास्तरीय स्पर्धेत द्वितीय क्रमांक प्रतिकेश मोरे(पळस्पे), तृतीय क्रमांक कौस्तुभ सोमण(पनवेल), उत्तेजनार्थ क्रमांक श्वेता कुलकर्णी (नवीन पनवेल), उमेश वाळके (पनवेल) यांनी पटकाविले.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

संक्षिप्त...

भरतनाट्यम गुरु दिपीका सराफ स्वयंसिध्दा राष्ट्रीय पुरस्कार ने सन्मानित

दै.रायगड नगरी । पनवेल

भरतनाट्यममध्ये आंतरराष्ट्रीय स्पर्धेत पनवेलची मान अभिमानाने उंचविणाऱ्या नृत्यआराधना कला निकेतन संस्थेच्या संचालिका व प्रशिक्षक दिपीका सराफ यांना अखिल भारतीय पत्रकार संघाच्या वतीने 'स्वयंसिध्दा राष्ट्रीय पुरस्कार' ने सन्मानित करण्यात आले. नाशिक येथील परशु-राम सायखेडकर नाट्यगृहात झालेल्या सोहळ्यात सुप्रसिद्ध अभिनेते चिन्मय उदगीरकर, मिसेस इंडिया इंटरनॅशनल संगित खैरनार यांच्या हस्ते दिपीका सराफ यांना पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. यावेळी सामाजिक, शैक्षणिक, कला, क्रीडा, सांस्कृतिक क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

नृत्य आराधना कलानिकेतन संस्था गेल्या दहा वर्षांपासून पनवेलमध्ये नृत्यांचे धडे विद्यार्थ्यांना देत आहे. अल्पावधीतच या संस्थेच्या माध्यमातून शेकडो विद्यार्थी प्रशिक्षित झाले असून या संस्थेतील विद्यार्थी सातत्याने चमकदार कामगिरी करत आहेत. देशात आणि परदेशात झालेल्या अनेक स्पर्धांमध्ये सुवर्णयश संपादन करत पनवेलसह रायगडचे नाव अधिक उज्वल केले आहे. या विद्यार्थ्यांना दिपीका सराफ यांचे प्रशिक्षक म्हणून मौल्यवान मार्गदर्शन लाभत असते. त्यांच्या या उत्तम कामगिरीबद्दल अखिल भारतीय पत्रकार संघाच्या वतीने राष्ट्रीय स्तरावरील पुरस्कार देऊन सन्मान केला आहे.

खारघर व नवीन पनवेल शहरातील शेकडो उत्तर भारतीय शिवसेनेत

दै.रायगड नगरी । पनवेल

शिवसेना पक्षप्रमुख तथा राज्याचे मुख्यमंत्री उद्धव बाळासाहेब ठाकरे व युवासेना प्रमुख तथा राज्याचे पर्यावरण व पर्यटन मंत्री आदित्य ठाकरे यांच्या कार्यप्रणाली वर प्रेरित होऊन, तसेच शिवसेना रायगड जिल्हाप्रमुख रायगड शिरीष घरत यांच्या नेतृत्वाखाली खारघर व नवीन पनवेल शहरातील शेकडो उत्तर भारतीयांनी शिवसेना पक्षात जाहीर पक्ष प्रवेश केला. याप्रसंगी शिवसेनेचे पनवेल महानगर प्रमुख रामदास शेवाळे, तालुका संपर्क प्रमुख योगेश तांडेल, तालुका संघटक भरत पाटील, तालुका प्रमुख एकनाथ म्हात्रे आदी पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

नव्याने नोकर भरती होत नसल्यामुळे केला महाराष्ट्र बँकेने संप

बँक व्यवस्थापनाने गांभीर्य न घेतल्यास पुन्हा २ दिवसीय संप पुकारण्याचा इशारा

दै.रायगड नगरी । पनवेल

ऑल इंडिया बँक ऑफ महाराष्ट्र एम्प्लॉइज फेडरेशनच्या वतीने ग्राहकांची होणारी गैरसोय टाळण्यासाठी बँक व्यवस्थापनाने बँकेच्या रिक्त झालेल्या जागांवर नव्याने भरती करावी या मागणीसाठी पनवेल येथील महाराष्ट्र बँकेच्या कर्मचाऱ्यांनी सोमवारी संप पुकारला. यावेळी बँक व्यवस्थापनाने जर या रिक्त जागा भरल्या नाहीत तर पुन्हा येत्या २२ आणि २३ ऑक्टोबर रोजी २ दिवसीय संप पुकारणार असल्याचा इशारा महाराष्ट्र बँकेचे पनवेल शाखेचे प्रबंधक अरविंद मोरे यांनी दिला आहे.

महाबँकेतील सर्व कर्मचारी संघटनांनी आज एक दिवसाच्या लाक्षणिक संपावर जाण्याचा निर्णय घेवून हा संप यशस्वी पार पाडला. या संपामुळे ग्राहकांच्या होणाऱ्या गैरसोयींबद्दल कर्मचाऱ्यांची आपुलकी यातून समोर आली. हा संप प्रामुख्याने नोकर भरतीच्या मागणीसाठी

करण्यात आला आहे. गेल्या अनेक वर्षांपासून बँक मृत्यू, निवृत्ती, राजीनामा, पदोन्नती यामुळे रिकाम्या झालेल्या जागा देखील भरत नाही. या काळात बँकेने अनेक नवीन शाखा उघडल्या, बँकेचा व्यवसाय अनेक पटीने वाढला. याचा परिणाम म्हणुन बँकेत आज १२७१ अशा शाखा आहेत, मात्र याठिकाणी एकही सफाई कर्मचारी नाही, तर ६९७ अशा शाखा आहेत जेथे एकही शिपाई नाही. यातील ४४८ शाखा आहेत जेथे दोन्ही सफाई कर्मचारी तसेच शिपाई नाही. या शिवाय ५५ शाखांमध्ये एकही क्लार्क नाही, ७२९ अशा शाखा आहेत जेथे फक्त एक क्लार्क आहे तर ६६८ शाखेत फक्त दोन क्लार्क आहेत.

या काळात सरकारने बँकेमार्फत अनेक योजना ज्यामध्ये जनधन, अटल पेंशन, मुद्रा, स्वनिधी, विमा योजना, अनुदानाचे वाटप आदी योजना राबविल्या. यामुळे बँकित कामाचा बोजा खूप वाढला. कर्मचाऱ्यांना स्वतःच्या आजारपणासाठी किंवा जवळच्या नातेवाईकांच्या आजारपणात देखील रजा मिळत नाही. यामुळे कर्मचारी तणावाखाली काम करत आहेत. याचा ग्राहक सेवेवर देखील खूप विपरीत परिणाम होत आहे. यामुळे अनेक शाखेतून क्षमता असताना देखील व्यवसाय वाढू शकत नाही. याचा बँकेच्या व्यवसायावर देखील अनिष्ट परिणाम झाला आहे.

या पार्श्वभूमीवर सर्व संघटनांनी विनंती, पाठपुरावा हे सर्व प्रयत्न विफल झाल्यानंतर नाईलाजाने हे आंदोलन सुरू केले आहे. यात कर्मचाऱ्यांनी मागणी दिन पाळला. निदर्शने केली, धरणे धरली मात्र अद्यापही बँक व्यवस्थापनाने त्याची योग्य ती दखल घेतली नाही म्हणुन अखेर आज २७ सप्टेंबर रोजी एक दिवसाच्या लाक्षणिक संपाचा निर्णय घेवून तो यशस्वीपणे पार पाडला गेला. तसेच यावेळी बँकेच्या ग्राहकांना शाखा प्रबंधक अरविंद मोरे यांनी या संपाला पाठिंबा देण्याचे आवाहन केले आहे

कंपनी महाराष्ट्रात आणि नोकर भरती गुजरातमध्ये?

टॉपवर्थ कंपनीवर सुधागड मनसेची धडक, सर्व व्यवस्थापक गायब

दै.रायगड नगरी । धम्मशील सावंत

स्थानिक भूमिपुत्र , सुशिक्षित बेरोजगार यांना रोजगार मिळवून देण्यासाठी सुधागड तालुका मनसे सातत्याने आग्रही भूमिकेत असते.

सुधागड तालुक्यातील टॉपवर्थ कंपनी मध्ये सध्या शेकडोच्या घरात नोकर भरती सुरू आहे. मात्र ही भरती प्रक्रिया व मुलाखत गुजरात येथे होत आहे. याचा जाब विचारण्यासाठी मनसे सुधागड तालुका अध्यक्ष सुनिल साठे यांच्या नेतृत्वाखाली सोमवारी (ता.२७) कंपनीवर थेट धडक देण्यात आली. मनसेचा इतका धसका घेऊन कंपनीमध्ये एकही व्यवस्थापक कामावर आले नाहीत.

मात्र बुधवारी (दि.२९) मनसे पुन्हा आक्रमकपणे कंपनीवर जाणार आहे. मनसे तालुका अध्यक्ष सुनील साठे यांनी सांगितले की कंपनी महाराष्ट्रात आहे. जमिनी स्थानिकांच्या घेतल्या आहेत तर मुलाखत गुजरात मध्ये कशी होते. ती सुधागड मध्येच झाली पाहिजे.

आणि यासाठी लागणारे कर्मचारी सुद्धा महाराष्ट्रातील विशेष करुन सुधागड मधील घ्यावे लागतील. योग्य पात्रतेची मुले येथे असतांना परराज्यातील मुले घेणे अयोग्य आहे. असे देखील सुनील साठे यांनी सांगितले.

यावेळी कंपनी व्यवस्था पनाकडून सहयोगाची भूमिका न घेतल्यास खळखट्याक आंदोलन करण्याच्या तयारीत मनसे असल्याचे दिसते.

यावेळी मनसे सुधागड तालुका अध्यक्ष सुनिल साठे, विभाग अध्यक्ष केवल चव्हाण, शाखा अध्यक्ष परेश वनगले, चेतन शिंदे, शेखर चव्हाण, प्रशांत कदम, माजी उपसरपंच राजेश शिंगाडे, संदीप काळभोर रमेश घोंगे, रोहित साळुंखे, अजिंक्य पाशिलकर व रोहण देसाई आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

गडब येथे रक्तदान शिबिराचे आयोजन ; ५० रक्तदात्यांनी केले रक्तदान

दै.रायगड नगरी । पेण

पेण तालुक्यातील गडब येथील मंगलमुर्ती मित्र मंडळाने साखराचौथ गणेशोत्सवा निमित्त कच्छ युवक संघटना, साई ब्लड बॅक यांचे विद्यमाने रक्तदान शिबिराचे आयोजन केले होते याशिबिराला येथील युवकांनी उत्सफुर्त प्रतिसाद देत ५० रक्तदात्यानी रक्तदान केले. या वेळी रक्तदात्याला साई ब्लड बॅकेकडुन प्रमाणपत्र तर कच्छ युवक संघटनेकडुन भेटवस्तु देण्यात आली. या रक्तदान शिबिराचे उदघाटन कच्छ युवक संघटने अध्यक्ष धिरजभाई छेडा, यांचे हस्ते करण्यात आले या वेळी चेतन छेडा, रकचंद सावळा, राहुल भाई, राजेश गाळा, आकाश शहा, चित्राग छेडा, मंगलमुर्ती मित्र मंडळाचे अध्यक्ष मनिष पाटील, गणपत पाटील, वासुदेव पाटील, मनोहर पाटील, सुशिल कोठेकर, नित्यानंद पाटील , अभिजित पाटील आदि उपस्थित होते. तर या रक्तदान शिबिरातील रक्त संकलनाचे काम साई ब्लड बॅकेचे डॉ. रामेश्वर राजपुत, डॉ. शारदा अनचन व त्याच्या सहकाऱ्यांनी केले.

अपघाती निधन झालेल्या संदीप पाटील यांच्या वारसाला १२ लाखांचा धनादेश सुपूर्द

दै.रायगड नगरी । उरण

उरण तालुक्यात वशेणी येथील रहिवासी कार्यकर्ते संदिप नारायण पाटील यांचा कामावर दुचाकीने जात असताना ट्रेलरच्या धडकेने खोपटा पुलाजवळ २१ सप्टेंबर रोजी अपघाती मृत्यू झाला होता. घरातील करता- कमवीताच हरपल्याने पाटील कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला, त्यांच्या कुटुंबावर आर्थिक संकट कोसळले.

सदर अपघाताची माहिती मिळताच शिवसेना रायगड जिल्हाप्रमुख तथा उरण माजी आ. मनोहर भोईर यांनी घटनास्थळी धाव घेऊन ओम मुव्हिंग अँड स्टोरेज प्रा.लि. कंपनीच्या अधिकाऱ्यांसोबत चर्चा करून मयत संदिप पाटील याच्या कुटुंबियांना ओम मुव्हिंग अँड स्टोरेज प्रा.लि. कंपनीकडून १२ लाखांची आर्थिक मदत मंजूर करून घेतली होती. काल वशेणी येथील संदिप पाटील यांच्या निवासस्थानी सांत्वनाची भेट देऊन बारा लाखांचा धनादेश त्यांच्या कटुंबाकडे सुपूर्द केला. तसेच संदिप पाटील हे सी-बर्ड कंपनीमध्ये सुरक्षारक्षक म्हणून कार्यरत होते.

मे.मुजावर साहेब

अॅड.हेमा भगत

जाहीर नोटीस

पनवेल येथील सह दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर पनवेल

चौ.अर्ज क्र.१२२६/२०२१

नि.नं.८/ड

ने.ता.२८/१०/२०२१

१) श्रीमती.कांतादेवी गणेशकुमार जिंदल
वय : ४३ वर्षे, धर्म : हिंदू, व्यवसाय : गृहिणी
२) कु.नेहा गणेशकुमार जिंदल
वय : २० वर्षे, धर्म : हिंदू, व्यवसाय : शिक्षण
३) कु.हर्ष गणेशकुमार जिंदल
वय : १९ वर्षे, धर्म : हिंदू, व्यवसाय : शिक्षण
सर्व रा.रुम नं.६, के.एल.६,
बिल्डींग नं.८, सेक्टर ३ ई, कळंबोली, ता.पनवेल — अर्जदार

सदनिकेचे वर्णन

शहर	सदनिका क्र.	किंमत
कळंबोली ता.पनवेल	ऑफिस नं.६०८ सी विंग, सहावा मजला, स्टील चेंबर, सेक्टर केडब्ल्यूसी स्टील मार्केट, प्लॉट नं.५१४, कळंबोली, ता.पनवेल	७००,०००/-

वरील अर्जदार क्र.१ ह्या श्री गणेश कुमार जिंदल यांची पत्नी आहे व अर्जदार क्र.२ ही त्यांची मुलगी आहे व अर्जदार क्र.३ हा त्यांचा मुलगा आहे. श्री.गणेश कुमार जिंदल यांचे निधन दि.२०/०३/२०२० रोजी डी. वाय.पाटील हॉस्पिटल नेरुळ नवी मुंबई येथे झाले आहे. श्री.गणेश कुमार जिंदल यांच्या निधनाची नोंद नेरुळ महानगरपालिकेमध्ये केलेली आहे. नेरुळ महानगरपालिकेने त्यांच्या मृत्यूचा दाखला दिलेला आहे.

वरील उक्त अर्जदारांनी वारस दाखला मिळविण्याकरिता अर्ज दाखल केला आहे. त्यापेक्षा सदरहू अर्जदार मयताचे वारसदार नाहीत असे कोणास समजविण्याचे असेल आणि वारस दाखल्याबद्दल कोणाचे हक्क अथवा हितसंबंध अशी कोणत्याही प्रकारची तक्रार वगैरे असल्यास त्याने तशी लेखी हरकत हा जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यापासून १ महिन्याच्या आत ह्या न्यायालयात हजर होवून दाखल करावी.

वरील मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदरहू कोर्ट वरील अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्याला सदरहू मयताचे मिळकतीचे वारस म्हणून दाखला देईल व त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.२७/०९/२०२१ रोजी सहीने व कोर्टाचे शिक्क्यानिशी दिली.

सही/- कोर्टाचा शिक्का सही/-
क.लिपीक सहा.अधिक्षक
दि.न्याया, पनवेल दि.न्या.व.स्तर, पनवेल

मे.मुजावर साहेब

प्रो.जमा.६-२५ — अर्जदाराचे वकील
अॅड.दिपक आर शेळके

जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.सिव्हील जज्ज (सि.डी./ज्यु.डी.) यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्र.४९३/२०२१

नि.नं.७/ड

ने.ता.३०/१०/२०२१

१) श्रीमती.ज्योती माधव महाजन
वय : ७० वर्षे, धंदा : गृहिणी
२) श्री.प्रकाश माधव महाजन
वय : ५० वर्षे, धंदा : नोकरी
अर्जदार क्र.१ व २ रा.आर.के.स्टुडीओच्या मागे,
टाईप ४, वैकुंठ बिल्डींग, फ्लॅट नं.७, आर.सी.एफ.
कॉलनी, चेंबूर, मुंबई, महाराष्ट्र-४०००७४
३) सौ.सुमती संदीप तडस
पुर्वाश्रमीची सुमती माधव महाजन
वय : ४६ वर्षे, धंदा : नोकरी
रा.ए-२४, सायली गार्डन अपार्टमेंट,
नागराज रोड, मिडी पॉईंट हॉस्पिटल जवळ,
औंध, पो.गणेश खिंड, पुणे-४११००७ — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाला

ज्याअर्थी माधव शामराव महाजन हे दि.०८/११/२००५ रोजी रा.सुश्रुत हॉस्पिटल, चेंबूर, मुंबई येथे मृत्यू पावले आहेत. तसेच त्यांची आई कै.मनाबाई शामराव महाजन ह्या दि.०१/०८/१९८२ रोजी रा.मोहपा, ता.कळमेश्वर ,जि. नागपूर येथे मयत झाल्या आहेत. त्यांचे नावे खालील वर्णनाची मिळकत आहे.

मिळकतींचे वर्णन

मौजे : पालीदेवद, ता.पनवेल, जि.रायगड येथील फ्लॅट नं.१०३, बिल्डींग नं.४, पहिला मजला, क्षेत्र ६६५ चौरस फूट बांधीव मिळकत शिव सह्याद्री हौ.सो.लि., गट नं.८/१ ब (२)

कै.माधव शामराव महाजन यांचे मृत्यूपश्चात त्यांस अर्जदार हे वारस आहेत. सदर वारसांव्यतिरिक्त इतर कोणीही वारसदार नाहीत. सबब, अर्जदार यांनी सदरचा वारस दाखला मिळण्यासाठी अर्ज करीत आहे. सदर वासांव्यतिरिक्त इतर कोणीही वारसदार नाहीत. सबब, सदरचा वारस दाखला अर्जदार यांस देण्यासंबंधी कोणाही इसमाच्या कोणत्याही हरकती असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ३० दिवसांचे आत या न्यायालयात सादर कराव्यात. मुदतीत हरकती न आल्यास कोणत्याही हरकती नाहीत असे समजून अर्जदार यांस वारस दाखला देण्यात येईल व मागाहून येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज तारीख २७/९/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिली.

सही/- कोर्टाचा शिक्का सही/-
क.लिपीक सहा.अधिक्षक
दि.न्या.व.स्तर, पनवेल दि.न्या.व.स्तर, पनवेल

मे.मुजावर साहेब

अॅड.अजित धनराज म्हात्रे

जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्र.१३५९/२०२१

नि.नं.८/ड

ने.ता.१०/११/२०२१

१) श्रीमती.मैना काशिनाथ म्हसकर
वय : ७३ वर्षे, धंदा : गृहिणी
२) श्री.रामदास काशिनाथ म्हसकर
वय : ४२ वर्षे, धंदा : नोकरी
३) सौ.गंगा उर्फ अनिता अनिल सांबरे
वय : ३९ वर्षे, धंदा : गृहिणी
सर्व रा.वरचे ओवळे, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाला

कै.काशिनाथ रामभाऊ म्हसकर हे दि.२७/०९/२०२० रोजी मौजे : शेलार हॉस्पिटल आणि आय.सी.यु., तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड येथे मयत झाले आहेत. तसेच त्यांची आई कै.धाकलीबाई रामभाऊ म्हसकर ह्या मौजे : वरचे ओवळे, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड येथे फार वर्षापूर्वी मयत झाल्या आहेत.

कै.काशिनाथ रामभाऊ म्हसकर यांचे नावे असलेल्या तसेच ताबेकब्जातील व मालकीच्या असलेल्या खालील वर्णनाच्या मिळकती आहेत.

मिळकतीचे वर्णन

मौजे : ओवळे, ता.पनवेल, जि.रायगड

युनिट केस नं.	सर्व्हे नं.	हिस्सा नं.	क्षेत्र (चौ.मी.)
ओवळे-१६	७५	११	६१.३०
ओवळे-२०३+२५७	६३	१ अे	०-१४-०
	७१	२+३+४+५+७+सी	०-१३-७
	७४	४	०-०१-०
ओवळे-२२८+२४०+२७१	४०	१२	०-०७-०
	६३	१ बी	०-०७-०
	७४	१	०-००-५
ओवळे-२५६	७५	१ अे	१-३१-०
ओवळे-२१७	७०	१ सी + २ अे	०-२९-८
	७०	३+४+५/एफ	०-०३-५
	७५	१ सी	०-२८-०

सदरच्या मिळकती ह्या नवीन मुंबई प्रकल्पाकरिता सिडकोने संपादीत केल्या आहेत. सदर मिळकतीचा ॲवॉर्ड हा कै.काशिनाथ रामभाऊ म्हसकर यांच्याच नावाने प्रसिद्ध झालेला आहे.

सदर मिळकतीच्या मोबदल्यात खालीलप्रमाणे भूखंड वाटप करण्यात आलेले आहे.

मौजे	प्लॉट नं.	से.	क्षेत्र (चौ.मी.)
पुष्पकनगर वडघर	१००	१	१९०
पुष्पकनगर वडघर	१०	३	९७०
पुष्पकनगर वडघर	८	२७	४६०
पुष्पकनगर वडघर	९	८	२०.७०
पुष्पकनगर वडघर	६१	६	१८०

तसेच वर नमूद केलेल्या मिळकतीबाबत कै.काशिनाथ रामभाऊ म्हसकर यांचे वारसदार या नात्याने कै.काशिनाथ रामभाऊ म्हसकर यांचे हिश्श्याचे मिळणारे किंवा तसेच इतर आर्थिक फायदे मिळवून घेण्याकरिता अर्जदार यांना तसा वारसदाखला मिळण्यासाठी अर्जदार यांनी दि.चौ.अर्ज पनवेल येथील मे.सह दिवाणी न्या.व.स्तर यांच्या कोर्टात दाखल केलेला आहे.

सदर वर नमूद केलेलया मिळकतीतील कै.काशिनाथ रामभाऊ म्हसकर यांचे हिश्श्यास अर्जदार हे वारसदार असल्याबाबत अर्जदार यांचे नावाने वारसदाखला देण्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात हजर राहून हरकत कळवावी. वरील मुदतीत हरकत न आल्यास नोटीसीच्या मुदतीनंतर अर्जदार यांचे नावाने वारस दाखला दिला जाईल. मात्र मागाहून कोणाचीही हरकत किंवा तक्रार ग्राह्य धली जाणार नाही.

आज तारीख २७/०९/२०२१ रोजी माझ्या सही शिक्क्यानिशी दिली.

सही/- कोर्टाचा शिक्का सही/-
क.लिपीक सहा.अधिक्षक
दि.न्या.व.स्तर, पनवेल दि.न्या.व.स्तर, पनवेल

मे.मुजावर साहेब

अॅड.शशिकांत काळू म्हात्रे

जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्र.१२०५/२०२१

नि.नं.८/ड

ने.ता.२५/११/२०२१

कै.दत्तात्रेय हरी ठाकूर
१) श्रीमती.नर्मदा दत्तात्रेय ठाकूर
वय : ६५ वर्षे, धंदा : गृहिणी
२) श्री.महेश दत्तात्रेय ठाकूर
वय : ४५ वर्षे, धंदा : शेती
३) श्री.नितीन दत्तात्रेय ठाकूर
वय : ४१ वर्षे, धंदा : शेती
४) श्रीमती.सविता दत्तात्रेय ठाकूर
वय : ४३ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.धुतूम, ता.उरण, जि.रायगड
५) श्रीमती.नयना वसंत तांडेल
वय : ५० वर्षे, धंदा : गृहिणी
रा.कळंबुसरे, ता.उरण, जि.रायगड
६) सौ.निलम कमलाकर घरत
वय : ४८ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.कंठवली, ता.उरण, जि.रायगड — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाला

ज्याअर्थी अर्जदार नं.१ यांचे पती अर्जदार नं.२ ते ६ यांचे वडील कै.दत्तात्रेय हरी ठाकूर हे दि.१८/०८/२०२० रोजी ओमकार हॉस्पिटल, खारघर, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड येथे मयत झाले आहे. तसेच त्यांची आई कै.बुधुबाई हरी ठाकूर ह्या दि.११/११/१९८९ रोजी धुतूम, तालुका : उरण, जिल्हा : रायगड येथे मयत झाल्या आहेत.

कै.दत्तात्रेय हरी ठाकूर यांचे नावे असलेल्या तसेच ताबेकब्जातील व मालकीच्या असलेल्या खालील वर्णनाच्या मिळकती आहेत.

मिळकतीचे वर्णन (अ)

मौजे	युनिट केस नं.	सर्व्हे नं.	हिस्सा नं.	क्षेत्र
मुठेखार	२४/८६	७	११	०-५४-४
वालटीखार	१०१/८६	७	४	०-११-१
		३२	१	०-१५-०
सावरखार	३३७/८५/८६	१५४	ई ७	०-३३-९
धुतूम	३०/९२	८	६	०-१८-७
शेमटीखार	७८	१९	५	०-१६-७
		३२	५	०-१३-५
धुतूम	४	८	६ पी	०-९-५

सदरच्या मिळकती ह्या नवी मुंबई प्रकल्पाकरिता सिडकोने संपादीत केल्या आहेत. सदर मिळकतीचा ॲवॉर्ड हा कै.दत्तात्रेय हरी ठाकूर यांचे वडील कै.हरी बारक्या ठाकूर यांच्या नावाने प्रसिद्ध झालेला आहे. सदर वर नमूद मिळकतीत कै.दत्तात्रेय हरी ठाकूर त्यांचे पश्चात त्यांचे वारसदार या नात्याने अर्जदार यांचा सामाईक हिस्सा आहे. कै.हरी बारक्या ठाकूर यांच्या वारसांनी दिनांक २३/११/२००९ रोजी मे.उरण येथील दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर यांचे न्यायालयातून वारस दाखला क्र.३१३/२००७ घेतलेला आहे.

मिळकतीचे वर्णन (ब)

मौजे	सर्व्हे नं.	हिस्सा नं.	क्षेत्र
धुतूम	४८	१६ अ	०-४-१० पो.ख.०-१-५०
धुतूम	६०	५	०-१-३० पो.ख.०-०-२०

सदरच्या मिळकती ह्या नवीन मुंबई प्रकल्पाकरिता सिडकोने संपादीत केल्या आहेत. सदर मिळकतीचा ॲवॉर्ड हा कै.दत्तात्रेय हरी ठाकूर यांच्याच नावाने प्रसिद्ध झालेला आहे.

तसेच वर नमूद केलेल्या मिळकतीबाबत कै.दत्तात्रेय हरी ठाकूर यांचे वारसदार या नात्याने कै.दत्तात्रेय हरी ठाकूर यांचे हिश्श्याचे सरकारकडून मिळणारे किंवा सिडकोकडून मिळणारे १२.५ टक्के भूखंड तसेच इतर आर्थिक फायदे मिळवून घेण्याकरिता अर्जदार यांना तसा वारसदाखला मिळण्यासाठी अर्जदार यांनी दि.चौ.अर्ज पनवेल येथील मे.सह दिवाणी न्या.व.स्तर यांच्या कोर्टात दाखल केलेला आहे.

सदर वर नमूद केलेल्या मिळकतीतील कै.दत्तात्रेय हरी ठाकूर यांचे हिश्श्यास अर्जदार हे वारसदार असल्याबाबत अर्जदार यांचे नावाने वारस दाखला देण्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात हजर राहून हरकत कळवावी. वरील मुदतीत हरकत न आल्यास नोटीसीच्या मुदतीनंतर अर्जदार यांचे नावाने वारस दाखला दिला जाईल. मात्र मागाहून कोणाचीही हरकत किंवा तक्रार ग्राह्य धरली जाणार नाही.

आज दि.२७/९/२०२१ रोजी माझ्या सही शिक्क्यानिशी दिली.

सही/- कोर्टाचा शिक्का सही/-
क.लिपीक सहा.अधिक्षक
दि.न्या.व.स्तर, पनवेल दि.न्या.व.स्तर, पनवेल

संक्षिप्त...

गोशीन रियूच्या विद्यार्थ्यांची राज्यस्तरावर निवड

दै.रायगड नगरी । उरण

अलिबाग येथील कर्णिक हॉलमध्ये १० वी जिल्हा-स्तरीय ट्रेडिशनल बेल्ट / मास रेसलिंग स्पर्धाचे आयोजन करण्यात आली होती. त्यामध्ये पाणदिवे उरण व केळवणे - पनवेल क्लासच्या मुलांनी घवघवीत यश मिळविले व त्यांची निवड शिर्डी येथे होणाऱ्या राज्य स्तरीय स्पर्धेसाठी झाली आहे.

अनिश पाटील गोल्डमेडल, मंथन म्हात्रे गोल्डमेडल, रोहित घरत दोन गोल्डमेडल, श्लोक ठाकूर ब्रॉन्झ मेडल, योग म्हात्रे एक गोल्ड व एक सिल्व्हर मेडल, श्रेया म्हात्रे गोल्डमेडल, अमिषा घरत गोल्डमेडल, यश पाटील गोल्ड मेडल, गायत्री म्हात्रे गोल्डमेडल, आयुष पाटील गोल्डमेडल, अमिता घरत गोल्ड मेडल,अमर घरत गोल्ड मेडल,समीक्षा पाटील गोल्डमेडल,सेजल पाटील गोल्ड मेडल पटकाविले. या स्पर्धेचे अध्यक्ष संतोष कवळे होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून पोलीस इन्स्पेक्टर जिया चव्हाण रायगड पोलीस उपस्थित होत्या.

संतोष मोकल, रोहन गुरव,राकेश म्हात्रे व गोपाळ म्हात्रे उपाध्यक्ष यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.विजेत्या सर्व स्पर्धेकांचे कौतुक होत आहे. विविध स्तरातून त्यांच्यावर शुभेच्छा व अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

१८ वर्षीय तरुणी बेपत्ता

दै.रायगड नगरी । पनवेल

रॉयल मिडास सोसायटी, कोप्रोली येथील सानिया समीर खान (वय १८) ही तरुणी घरात कोणास काहीही न सांगता निघून गेली आहे. त्यामुळे ती हरवली असल्याची तक्रार पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. या तरुणीची उंची पाच फूट, एक इंच असून ती अंगाने सडपातळ, रंग गोरा आहे. तिचा चेहरा गोल असून अंगात चॉकलेटी कलरचा गाऊन, कानात सोन्याच्या छोट्या रिंगा घातले आहेत. पायात पैंजण आहेत. तिला हिंदी व इंग्रजी भाषा बोलता येते. या तरुणीबाबत अधिक माहिती असल्यास तालुका पोलीस ठाण्याचे पोलीस हवालदार अमोल कांबळे यांच्याशी संपर्क साधावा.

वाचकांना विनम्र सूचना

दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

कोकण पर्यटनाला चालना देण्यासाठी शासनाचे विविध प्रयत्न : मनोज रानडे

दै.रायगड नगरी । नवी मुंबई

कोकण विभागात कृषी पर्यटनाला मोठी संधी असून ४० कृषी पर्यटन केंद्रांना मंजूरी देण्यात आली असून पर्यटकांसाठी खूली केली आहेत. त्या माध्यमातून कोकणात पर्यटनासाठी मोठी संधी उपलब्ध होईल, असे कोकण विभागीय उपायुक्त मनोज रानडे यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.

आज जागतिक पर्यटन दिनानिमित्त पर्यटन संचालनालनालयाच्या अधिनस्त असलेले उपसंचालक (पर्यटन) प्रादेशिक कार्यालय नवी मुंबई यांच्यवतीने पत्रकार परिषद आयोजित केली होती. त्यात ते बोलत होते. या पत्रकार परिषदेत हनुमंत हेडे उपसंचालक (पर्यटन), डॉ.गणेश मुळे उपसंचालक (माहिती), डी. एन.राठोड वनक्षेत्रपाल कर्नाळा पक्षी अभयारण्य, संजय नाईक निसर्ग हॉस्पिटॅलिटीचे संचालक, तसेच पत्रकार उपस्थित होते. यावेळी उपायुक्त (सामान्य) श्री.रानडे यांनी उपस्थित पत्रकारांना जागतिक पर्यटन दिनानिमित्त शुभेच्छा दिल्या. तसेच दि.२ ऑक्टोंबर ते ८ ऑक्टोंबर दरम्यान फणसाड, कर्नाळा अभयारण्य जंगल ट्रेल (Jungal Trail) लिफलेटचे प्रकाशन करण्यात आले. सन १९८० पासून दरवर्षी २७ सप्टेंबर हा दिवस जागतिक पर्यटन दिन म्हणून साजरा केला जातो. विशेषत: कोकणाला पर्यटनाचा वारसा लाभलेला आहे. यावर्षी जागतिक पर्यटन दिनाचे घोषवाक्य सर्व समावेशक वाढीसाठी पर्यटन असे आहे. या घोषवाक्याला अनुसरुन प्रादेशिक कार्यालय कोकण विभाग, नवी मुंबई यांच्यावतीने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे.

एक भाग म्हणून फणसाड वन्यजीव अभयारण्य व कर्नाळा पक्षी अभयारण्याची जंगल ट्रेल (Jungal Trail) अशी एकदिवशीय सहल दि.२ ऑक्टोंबर ते दि.८ ऑक्टोंबर या कालावधीत आयोजित करण्यात आली आहे. निसर्ग हॉस्पिटॅलिटीचे संचालक संजय नाईक हे या सहलीचे आयोजन करणार आहेत. कोकणातील समुद्र किनाऱ्यालगत शासकीय व खाजगी जमिनीवर आरामखुर्च्या आणि मोठया छत्र्यांसह तात्पुरत्या हंगामी चौपाटी कुट्या (बीच शॅक), सार्वजनिक चौपाटी सुविधा केंद्र, उभारण्यासाठीचे बीच पर्यटन धोरण यामध्ये प्रथम रत्नागिरी जिल्हयातील गुहागर आणि आरेवारे समुद्रकिनारा, सिंधुदूर्ग जिल्हयातील कुणकेश्वर आणि तारकर्ली समुद्र किनारा, रायगड जिल्हयातील वर्सोली आणि दिवे आगार समुद्र किनारा, पालघर जिल्हयातील केळवा आणि बोर्डी समुद्र किनारा येथे बीच शॅक धोरण राबविण्यात येणार आहे.

खा.श्रीरंग बारणे यांची नगराध्यक्षांनी घेतली सदिच्छा भेट

दै.रायगड नगरी । मुकुंद रांजाणे

माथेरान : माथेरान मधील विविध समस्या आणि वेळोवेळी निर्माण होत असणाऱ्या अडचणींवर लवकरात लवकर काहीतरी मार्ग काढावा जेणेकरून इथल्या सर्वसामान्य लोकांना त्याचप्रमाणे पर्यटकांना अडचणी भासणार नाहीत.असे माथेरान नगरीच्या विद्यमान नगराध्यक्षा,उत्तम प्रशासक प्रेरणा सावंत यांनी मावळचे खासदार तथा संसदरत्न श्रीरंग बारणेंच्या निदर्शनास आणून दिले.

आज दि.२७ रोजी अलिबाग येथील जिल्हापरिषद विश्राम गृहात सदिच्छा भेट घेतली त्यावेळी इथल्या विविध प्रश्नांची उकल करण्यासाठी सांगितले यावेळी शिवसेनेचे रायगड जिल्हाप्रमुख मनोहर शेठ भोईर, नगराध्यक्षा प्रेरणा सावंत यांच्या सह माथेरान नगरपालिका गटनेते, तथा बांधकाम सभापती प्रसाद सावंत, कर्जतच्या विद्यमान नगराध्यक्षा सुवर्णा जोशी, केतन जोशी, कर्जतचे माजी नगरसेवक संतोष पाटील आदी उपस्थित होते.

पावसाळा संपून लवकरच माथेरानचा मुख्य सुट्टयांचा हंगाम सुरू होणार असून या पार्श्वभूमीवर पर्यटकांना उपलब्ध अशा सोयीसुविधा करणे आवश्यक आहे. ईथे येणारे पर्यटन हे मोटार गाडीने उतरल्यावर शटल ट्रेनने येत असतात तर बहुतांश पर्यटक हे अमन लॉज ते माथेरान स्टेशन दरम्यान रेल्वेच्या बाजूने पायी चालत येतात. याच रेल्वेच्या रुळांच्या दुतर्फा पेव्हर ब्लॉक बसविल्यास त्यावरून पर्यटक आपले अवजड सामान सुध्दा अगदी सहजपणे आणू शकतात यासाठी येणाऱ्या आर्थिक बजेटमध्ये हा प्रस्ताव करण्यात यावा असे गटनेते प्रसाद सावंत यांनी खासदार श्रीरंग बारणे यांच्याकडे स्पष्ट केले.

शेतकऱ्यांच्या विरोधातील तीन काळया कायद्यांविरोधात काँग्रेसच्या भारत बंदला संमिश्र प्रतिसाद

दै.रायगड नगरी । पनवेल

शेतकऱ्यांच्या विरोधातील तीन काळया कायद्यांचा विरोध करण्यासाठी काँग्रेस कमिटीच्या वतीने भारत बंदची हाक दिली होती. आज पनवेल शहरातून प्रभातफेरी काढून नागरिकांना भारत बंद मध्ये सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले. यावेळी काँग्रेसच्या वतीने पाळण्यात आलेल्या भारत बंदला पनवेलमध्ये समिश्र प्रतिसाद मिळाला.

यावेळी काढण्यात आलेल्या प्रभातफेरीमध्ये काँग्रेसचे महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष कॅप्टन कलावत, रायगड जिल्हा उपाध्यक्ष सतिश गायकवाड, पनवेल शहर जिल्हाध्यक्ष आर.सी. घरत, युवक काँग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष हेमराज म्हात्रे, पनवेल तालुका अध्यक्ष लतीफ शेख, नवीन पनवेल शहर अध्यक्ष राहुल जानोरकर, महिला आघाडीच्या निर्मला म्हात्रे, डॉक्टर वाळींजकर आदी पदाधिकारी उपस्थित होते. भारत बंद करण्यामागे मुख्य कारणे आर.सी.घरत यांनी समोर ठेवताना सांगितले की, शेतकऱ्यांच्या विरोधात तीन काळया कायद्यामुळे संपूर्ण देशाची आर्थिक स्थिती पूर्णतः ढासळलेली आहे,

तसेच देशातील सर्व सार्वजनिक उपक्रम यामध्ये रेल्वे बँका विमानसेवा विमा कंपन्या सार्वजनिक उद्योग दूरसंचार आणि बंदरे यांची एक एक करून विक्री केली गेली त्यामुळे देशातील तरुण वर्ग बेरोजगार झाला. दिल्लीमध्ये गेल्या अकरा महिन्यांपासून आंदोलन करीत असलेल्या शेतकऱ्यांबाबत केंद्र सरकार उदासीनता दाखवत आहे. केंद्र सरकार भारतीय जनता पार्टीच्या हातात गेल्यानंतर पेट्रोल डिझेल आणि घरगुती गॅस सह जीवनावश्यक वस्तूंची कृत्रिम महागाई वाढवल्याबद्दल निषेध म्हणून या भारत बंद आंदोलनाची हाक समस्त भारतवासीयांना काँग्रेसच्या वतीने देण्यात आली.

किनेश्वरवाडीतील काँग्रेस व राष्ट्रवादी कार्यकर्ते शिवसेनेत दाखल

दै.रायगड नगरी । शैलेश पालकर

पोलादपूर : तालुक्यातील जनतेने आमदारकीची तीन वेळा संधी देण्यासाठी भरघोस मतदान केल्यामुळे आपण ज्यांनी मतदान केले नाही, अशांसाठीही विविध योजनांच्या माध्यमातून विकासकामे करण्याचा निर्णय घेतला आहे. किनेश्वरवाडी ते पेढावाडीपर्यंतचा १ कोटीचा रस्ता करताना आपले यामध्ये मतदार किती आणि या भागातील किती मतदारसंख्या अनुकूल होईल, याचा विचार आपण केला नाही. यामुळेच ग्रामस्थांनी शिवसेनेमध्ये प्रवेश करण्याचा निर्णय घेतला असल्याचे आ.भरत गोगावले यांनी खात्रीपूर्वक सांगितले.

याप्रसंगी व्यासपिठावर शांताराम गोळे, सरपंच मच्छिंद्र सुकाळे, राजिप सदस्य चंद्रकांत कळंबे, तालुकाप्रमुख निलेश अहिरे, वाकण विभागप्रमुख संजय मोदी, माजी तालुकाप्रमुख अंकुश सकपाळ, राजेश डांगे, ज्येष्ठ शिवसैनिक दशरथ उतेकर, विभागप्रमुख अनिल दळवी, किनेश्वरवाडीतील दिनकर दाभेकर बुवा, नारायण पवार, तानाजी पवार, रवींद्र कोंडाळकर, दगडू पवार व रामचंद्र ग.पवार तसेच संपर्क कार्यालयप्रमुख सुनील तळेकर आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी असंख्य महिला पुरूष कार्यकर्त्यांनी काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा त्याग करून शिवसेनेमध्ये प्रवेश केला. याप्रसंगी ग्रामपंचायत सदस्या सोनल संदीप पवार, पार्वती पवार, माया पवार, संगिता पवार, जनाबाई दाभेकर, सीताबाई दाभेकर, चंद्रा दाभेकर, पंडा दाभेकर, रंजना उतेकर, रंजना पवार, मंदा उतेकर, अनिता पवार, द्रौपदी कोंडाळकर, शिल्पा उतेकर, जिजाबाई पवार, सखुबाई गायकवाड, संगिता उतेकर, नारायण दाभेकर, नारायण उतेकर, लक्ष्मण दाभेकर, गोपाळ हरी पवार, किसन पवार, रामचंद्र जाधव, सहदेव पवार, शिवाजी पवार, चिमाजी गायकवाड तसेच अन्य काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने शिवसेनेमध्ये सामील झाले. आ.गोगावले यांनी, रस्त्याचे उदघाटन करायला येऊ. जिल्हा नियोजन मंडळाच्या बैठकीतून काही मिळवता आल्यास प्राधान्याने या भागातील उर्वरित कामे पूर्ण करण्यासाठी सक्रीय राहू, असे यावेळी सांगितले.

खराब रस्त्यांमुळे नागरिक व वाहनचालक मेटाकुटीला

दै.रायगड नगरी । पाली/बेणसे

सुधागड हा तालुका आदिवासी बहुल तालुका म्हणून ओळखला जातो. तालुक्यात जवळपास १०० महसुली गावे आहेत. तसेच साडे तीनशे पेक्षा अधिक आदिवासी व ठाकुरवाड्या असून त्या दुर्गम भागात तसेच डोंगरावर वसलेल्या आहेत. येथील रस्ते खस्ते खात आहेत, रस्त्यांची अवस्था दयनीय आहे. यातील काही गावे व वाड्यांपर्यंत कच्चा रस्ता किंवा पायवाटच जाते तीही स्थानिकांनीच तयार केलेली आहे. काही गावांना अजून पर्यंत साधे कच्चे रस्ते देखील नाही आहेत. तर अनेक गावे, वाड्यांपर्यंत कच्चे रस्ते किंवा खडी व मातीचा भराव असलेले रस्ते आहेत. काही रस्त्यांवर अस्ताव्यस्त पडलेले दगड व खडी आणि खड्डे आहेत. वर्षानुवर्षे रस्त्यांची साधी डागडुजी देखील झालेली नाही. स्थानीक प्रशासनाला व लोक प्रतिनिधींना या भयानक वास्तव्याची जाणीव असून देखील याबाबत त्यांच्याकडून काहीही उपाय किंवा तजवीज होतांना दिसत नाही. बऱ्याच ठिकाणी तर राजकारणी रस्त्याचे राजकारण करतात. मात्र निवडणूका झाल्यानंतर कोणीही तिकडे फिरकून पाहत नाही. अशी येथील लोकांची खंत आहे.

सुधागड तालुक्यातील सिध्देश्वर (खुर्द), कळंब, चेरफळवाडी, शिरसेवाडी, करंजाई यासह अनेक ठाकूरवाड्या, तसेच मढाळी, शिळोशी, पावसाळावाडी, दांड, गाठेमाळ, मुळशी, डुबेवाडी, दर्यागाव, चिवे, ढोकळेवाडी असे बहुसंख्य आदिवासी व कातकर वाड्या, कणी, गौळमाळ, गोगुळवाडा, गोकुळवाडा, कोंडी असे कित्येक धनगरवाडे सोबत गोमाशी, दिघेवाडी, खांडसई, घोटवडे, शिळोशी, मढाळी, कामथेकरवाडी, आसरे, नवघर, धोंडसे, वाघोशी, वांद्रोशी, पाच्छापूर, कोंडगाव, फणसवाडी, कोशिंबळे आदी असंख्य गावांना जाणाऱ्या मार्गाची देखील पुरती दुरवस्था झाली आहे. येथील रस्त्यांवर अक्षरशः मोठाले खड्डे पडले आहेत. खडी आणि माती बाहेर आली आहे. तर काही रस्त्यांची कित्येक वर्षे साधी दुरुस्ती देखील झालेली नाही. असा खडतर आणि खाचखळग्यांच्या रस्त्यावरून नागरिक, वृद्ध, विद्यार्थी, रुग्ण व महिला प्रवास करतात. कधीतरी लोकप्रतिनिधी किंवा शासनाला जाग येऊन ते रस्ता करतील किंवा डागडुजी करतील या भोळ्या आशेवर येथील लोक जगत आहेत.

नागोठण्यातील उर्दू हायस्कूल इमारतीच्या दुरुस्तीसाठी खा. सुनील तटकरेंकडून पाहणी

दै.रायगड नगरी । वाकण

नागोठणे एज्युकेशन सोसायटीच्या नादुरुस्त झालेल्या उर्दू हायस्कूल व जुनिअर कॉलेज इमारतीची पाहणी खासदार सुनील तटकरेंकडून सोमवारी (दि.२७) सकाळी करण्यात आली. यावेळी नागोठणे एज्युकेशन सोसायटीच्या स्थानिक शाळा व्यवस्थापन समितीच्या वतीने इमारत दुरुस्तीसाठी खर्चाचा अंदाजपत्रकीय प्रस्ताव खा. तटकरेंकडे सादर करून निधीची मागणी केली. इमारत दुरुस्तीसाठी निधी उपलब्ध होण्यासाठी सर्वोतोपरी सहकार्य केले जाईल असे आश्वासन यावेळी खा. सुनील तटकरे यांनी शाळा व्यवस्थापन समितीला दिले.

नागोठण्यातील उर्दू हायस्कूल या इमारतीच्या काही वर्ग खोल्यांचा स्लॅब व इतर काही भाग नादुरुस्त झाल्याने स्थानिक शाळा व्यवस्थापन समितीच्या वतीने रोहा पंचायत समितीचे सदस्य बिलाल कुरेशी यांनी काही दिवसांपूर्वी खा. सुनील तटकरे यांची सुतारवाडी येथे भेट घेऊन नादुरुस्त झालेल्या उर्दू हायस्कूलच्या या इमारतीच्या दुरुस्तीसाठी १२ ते १५ लाख रुपये निधीची मागणी केली होती. बिलाल कुरेशी यांनी सांगितल्यानुसारच आपण या इमारतीची प्रत्यक्ष पाहणी करण्यासाठी आल्याचे खा. सुनील तटकरे यांनी यावेळी स्पष्ट केले.

शून्य रुग्णसंख्येने म्हसळा तालुका कोरोना मुक्त ; लसीकरणावर भर

दै.रायगड नगरी । उदय कळस

म्हसळा : देशातील अनेक राज्यात वाढता कोरोनाचा प्रादुर्भाव पहाता लॉक डाऊनच्या पहिल्या व दुसऱ्या टप्प्यात चिंताजनक बाब होऊन बसली होती परंतु लोकसंख्येच्या तुलनेने म्हसळा तालुक्यात नागरिकांच्या सहकार्याने कोरोना प्रादुर्भाव रोखण्यास प्रशासनाला पुरते यश प्राप्त झाले आहे. शासनाने माझा कुटुंब,माझा परिवार,कोरोना बाबतीत घ्यावी लागणारी काळजी आणि गतीने झालेले लसीकरण त्यामुळेच तालुक्यातील जनतेला व प्रशासकीय यंत्रणेला कोरोनाची लाट रोखता आली.

तालुक्यात कोरोना बधितांची एकुण रुग्ण संख्या १०२१ इतकी नमूद आहे पैकी ९६७ रुग्ण बरे झाले आहेत.वेगवेगळ्या प्रकारच्या आजारांनी त्रस्त असलेले आणि कोरोना बाधित असलेले ५४ रुग्ण मृत्यू पावल्याची नोंद झाली आहे. तालुक्याची भौगोलिक रचना आणि लोकसंख्या पहाता कोरोनाच्या दोन लाटेत प्रादुर्भाव रुग्ण संख्या आणि कोरोनामुले रुग्ण दगावण्याची संख्या कितीतरी पटीने कमी आहे. सुरुवाती पासुनच नियोजन बद्ध खबरदारी घेतली गेल्याने कोरोनावर खऱ्या अर्थाने मात करण्यासाठी म्हसळा तालुका आरोग्य विभाग, तहसील कार्यालय, पोलिस यंत्रणा, मंडळ अधिकारी, तलाठी, ग्रामसेवक, नगर पंचायत प्रशासन, सफाई

कामगार, आशा वर्कर, पंचायत समिती प्रशासन व लोकप्रतिनिधी, ग्राम पंचायत प्रशासन व संबंधित लोकप्रतिनिधी, अंगणवाडी सेविका, विविध स्वयंसेवी संस्था, समाजातील प्रत्येक घटक, शिक्षण विभाग, प्राध्यापक, व्यापारी वर्ग, सर्व चालक वाहक संघटना, पोलिस पाटील, पत्रकार आदी यंत्रणेने कोरोना काळात आरोग्य यंत्रणेच्या बरोबरीने जनतेला वेगवेगळ्या प्रकारची माहिती, मदत करून प्रथम सर्वांना आपआपले मौल्यवान जीवन जगण्यासाठी धीरगंभीर केल्याने हळूहळू आता सर्वत्र कोरोना मुक्ती कडे वाटचाल करीत असतानाचे चित्र निदर्शनास येत आहे.

म्हसळा तालुक्यात दिनांक २३ जानेवारी अखेर ३०४५४ नागरिकांचे लसीकरण करण्यात आले आहे.या मध्ये २५५७० नागरिकांना पहिला आणि ७८८२ नागरिकांनी दुसरा डोस घेतला असल्याचा समावेश आहे.तालुक्यात प्राथमिक आरोग्य केंद्र म्हसळा, मेंदडी, खामगाव आणि ग्रामीण रुग्णालय म्हसळा येथे लसीकरणासाठी एकुण ३३८८० डोस उपलब्ध झाले होते पैकी ५३० डोस शिल्लक राहिले असल्याचे सांगितले जाते. गतीने लसीकरण करण्यासाठी नागरिकांनी स्वतःहुन पुढे यावे असे आवाहन तालुका आरोग्य अधिकारी डॉ प्रशांत गायकवाड यांनी केले आहे.

ग्राम पंचायत स्तरावर सरपंच, ग्रामसेवक यांच्या सहकार्याने लसीकरण कॅम्प सुरू करण्यात आले असल्याची माहिती गट विकास अधिकारी वाय.एम. प्रभे यांनी यांनी दिली आहे. नव्याने म्हसळा तालुक्यात एकाही कोरोना रुग्णाची नोंद नसली तरी नागरिकांनी तेवढेच सतर्क राहणे गरजेचे आहे. शासनाने घालुन दिलेल्या अटी व शर्थीचे पालन करणे आवश्यक आहे. राज्यात टप्याटप्याने अनलॉक होत असल्याने प्रवाशी आणि पर्यटकांचा ओघ वाढत जाणार आहे तेव्हा आवश्यक ती काळजी घेणे गरजेचे आहे. कोरोना मुक्त तालुका कायमस्वरूपी रहाण्यासाठी प्रत्येक नागरिकांनी या अगोदर शासन आणि प्रशासनाला जसे सहकार्य केले तसेच सहकार्य पुढेही करणे गरजेचे आहे आणि कोरोना प्रादुर्भाव रोखण्यासाठी दिलेल्या नियमावलीचा पालन करावे असे आवाहन म्हसळा तहसिलदार समीर घारे यांनी केले आहे.